नियमित फौ. ख. क्र. १३२/२०२४
सरकार -वि.- क्रिष्णा
नि.क्र. २६.

## बचाव पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - मानिक धोंडबाजी चौधरी,
वय ७५ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – धामणगाव विद्या मंदिर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**आरोपी तर्फे सर तपासणी-त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**

१. मी आरोपीला, त्याच्या पत्नीला व फिर्यादीला ओळखतो. ते लोक माझ्या गावचे आहेत व मी गावातील तंटामुक्ती समितीचा अध्यक्ष आहे म्हणून ओळखतो. मी सन २००८ पासून तंटामुक्तीचा अध्यक्ष आहे. सन २०२२-२३ मध्ये तंटामुक्ती समितीची आरोपी, त्याची पत्नी व फिर्यादीच्या वादासंबंधात बैठक घेतली होती. त्या बैठकीला पोलीस पाटील प्रमोद गणवीर, मी व इतर गावातील लोक उपस्थितीत होते. त्यावेळी आरोपीच्या पत्नीचे असे म्हणणे होते की, ती फिर्यादीसोबत लग्न करु इच्छीते. त्यावेळी फिर्यादीही तिच्यासोबत लग्न करायला तयार होता. त्यावेळी आरोपी म्हणाला की, त्याच्या पत्नीला लग्न करायचे असल्यास तिने मुलांनाही न्यावे. त्यावेळी गणेश रंगारी हा मुलांना घेऊन जाण्यास तयार नव्हता. त्यावेळी बैठकीमध्ये गणेश रंगारी मुलं घेऊन न जाण्याचा कारणावरुन लग्नास तयार झाला नाही. त्यावेळी ती बैठक तिथे संपली होती.

सरततपास संपला.

**उलट तपास सरकार पक्षातर्फे वकील श्री. जी.बी.राऊत यांचे मार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी आज आरोपीसोबत आल्यामुळे त्याने जसे मला सांगायला लावले तसे मी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या बाजुने तंटामुक्ती बैठकीमध्ये निर्णय दिल्यामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेली कुठलीही घटना घडली नाही.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक २२.१२.२०२५.

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.